# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ठेकेदार मे. जिजाऊ कंस्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि. यांचेमार्फत करणेत येत असलेल्या सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असलेबाबत व कामाची मुदत संपुष्टात आल्यानंतरही रस्त्याची कामे अर्धवट अवस्थेत असलेबाबत दि.26/01/2025 रोजीच्या दैनिक पुढारी या वृत्तपत्रात आलेल्या बातमी बाबत खालील प्रमाणे खूलासा करणेत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ठेकेदार मे. जिजाऊ कंस्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा.लि. यांचेमार्फत 1) अमर पॅलेस ते कोंबडी गल्ली पर्यंत रस्ता सी.सी. करणे. 2) शिवपूजा इमारत (विजयपार्क) ते प्लेझेंट पार्क रोडवरील सिल्व्हर क्राऊन इमारती पर्यंत चा रस्ता सी.सी. करणे. 3) श्री. गोळवलकर गुरुजी चौक ते स्व. प्रफूल्ल पाटील चौक पर्यतचा रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे. 4) मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पुनम गार्डन ते सालासर पर्यंत रस्ता सी.सी. रस्ता बनविणे. सदर कामे करणेत येत असून सदर कामे करीत असताना सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणेबाबत तसेच सुरु असलेली कामे संथगतीने होत असल्यामूळे कामे लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत ठेकेदारास वेळोवेळी नोटीस बजावणेत आलेल्या असून त्यांचे प्रतीनिधीस वारंवार तोंडी सुचना दिलेल्या आहेत. याशिवाय त्यांचेमार्फत करणेत येत असलेल्या सिमेंट कॉक्रीट रस्त्याची कोअर चाचणी करणेत आलेली असून सदर कामासाठी वापरणेत येणाऱ्या साहित्याची वेळोवेळी चाचणी करुन घेण्यात येत आहे.

सदर कामापैकी कांही ठिकाणच्या रस्त्याचा पृष्ठभाग खराब झाल्याचे निदर्शनास असल्यामूळे त्याठिकाणचे पॅनल तोडून घेण्यात येवून त्या ठिकाणी नव्याने पॅनल तयार करुन घेण्यात आलेले आहेत.

सदरील कामापैकी जवळपास 70% रस्त्याची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित कामे तातडीने पूर्ण करणेबाबत ठेकेदारास नोटीस बजावणेत येवून कामे करुन घेण्यात येत आहेत.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-13/24-25/RP/P-01